## मानवतेसाठीचा टाहो

*इस्लामविषयीचा भयगंड किंवा संसाधनांची कमतरता ही कारणं रोहिंग्या प्रश्नावरील निष्क्रियतेसाठी देणं योग्य होणार नाही.*

जगातील बहुतांश भागांमध्ये इस्लाम हा दहशतवादाचा धर्म असल्याचा कलंक लावला जातो, हे प्रतिपादन आता सरधोपट झालं आहे. दुसरीकडं बौद्ध धर्म हा शांततेचा, विवेकाचा, आणि विज्ञानाचा, आधुनिक जीवनमार्गाला अतिशय सुसंगत असा मानला जातो. परंतु, या कथनाला छेद देणारा वांशिक हिंसाचार दक्षिण आणि आग्नेय आशियामध्ये अलीकडच्या इतिहासात अनेकदा घडलेला आहे. म्यानमारमध्ये सैन्यदलांचा सक्रिय पाठिंबा असलेल्या बौद्ध अतिरेक्यांकडून मुख्यत्वे मुस्लीम अल्पसंख्याक असलेल्या रोहिंग्यांवर होत असलेले अत्याचार, हा याचा सर्वांत अलीकडचा दाखला आहे. या मानवी समस्येविषयी भारतासह अनेक देशांनी दिलेला अधिकृत प्रतिसाद मात्र असंवेदनशील व इस्लामविषयी भयगंड दाखवणारा आहे.

'अराकान रोहिंग्या साल्वेशन आर्मी' (अराकान रोहिंग्या मुक्ती सेना) या संघटनेशी संबंधित बंडखोरांनी २५ ऑगस्ट २०१७ रोजी राखाइन राज्यातील सैन्याच्या तळांवर आणि पोलिसांच्या चौक्यांवर हल्ले केले, त्यानंतर हिंसाचाराची मालिका सुरू झाली. म्यानमारच्या सैन्यदलांनी तत्काळ रोहिंग्यांवर कारवाई सुरू केली आणि वांशिक हिंसाचाराचा भडका उडाला, यामध्ये हजारो सर्वसामान्य रोहिंग्यांचा मृत्यू झाला व हजारो जण बेघर झाले. प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार, ऑगस्टपासून ९० हजारांहून अधिक रोहिंग्या निर्वासित म्हणून बांग्लादेशात आले आहेत, तर आणखी सुमारे २० हजार लोक म्यानमार-बांग्लादेश सीमेवर ताटकळत आहेत. आपल्या सीमेमधील रोहिंग्या अत्याचारितांपर्यंत पोचण्यापासून संयुक्त राष्ट्रांच्या मदत-संस्थांना म्यानमारनं प्रतिबंध केला आहे. या प्रदेशात प्रसारमाध्यमांना प्रवेशास बंदी केली आहे. त्यामुळं हा राज्यसंस्थापुरस्कृत जनसंहार सुरू आहे, याविषयी आता फारशी शंका राहिलेली नाही. तरीही रोहिंग्या निर्वासितांना आसरा पुरवण्याबाबत म्यानमारची शेजारी राष्ट्रं अनुत्सुक आहेत. हे निर्वासित भारताच्या अंतर्गत सुरक्षेला संभाव्य धोका ठरतील, असं म्हणण्यापर्यंत भारत सरकारची मजल गेली आहे.

म्यानमारमध्ये १९६२ साली सैन्यानं बंड करून सत्ता हातात घेतल्यापासून रोहिंग्या समुदायाला सातत्यानं छळाला सामोरं जावं लागतं आहे. सैनिकी सत्ताधिशांनी रोहिंग्यांचे नागरिकत्वाचे अधिकार काढून घेतले आणि त्यांना आरोग्यसेवा, शिक्षण व रोजगार नाकारले. परंतु, २०११ साली म्यानमारचा लोकशाहीकडं तथाकथित प्रवास सुरू झाल्यापासून या अत्याचारांची वारंवारता आणि तीव्रता वाढू लागली. लोकांचा पाठिंबा टिकवून ठेवण्यासाठी सैन्यदलांनी बौद्ध धर्माच्या समर्थकांना व अतिरेकी बौद्ध गटांना रोहिंग्यांवर हल्ले करण्यासाठी भडकावलं.

ऑक्टोबर २०१६मध्ये भडका उडालेल्या हिंसाचारातूनच सध्याचा संघर्ष निर्माण झाला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या तथ्यशोधन अभियानानं फेब्रुवारी २०१७मध्ये या संदर्भातील एक अहवाल प्रसिद्ध केला.

गेल्या वर्षी सैन्यदलांनी रोहिंग्यांवर केलेले अत्याचार 'मानवतेविरोधातील गुन्हे' आणि 'संभाव्य वंशसंहार' ठरू शकतात, असा निष्कर्ष या अहवालात काढण्यात आला होता. म्यानमार सरकारनं हा अहवाल नाकारला. मे २०१७मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकारानं आणखी एक तथ्यशोधन अभियान म्यानमारमध्ये जाण्यासाठी तयार झालं. परंतु या अभियानातील एकाही सदस्याला व्हिसा मिळणार नाही, अशी तजवीज म्यानमार सरकारनं केली. संयुक्त राष्ट्रांच्या अशा प्रकारच्या हस्तक्षेपामुळं समुदायांतर्गत शत्रुभाव आणखी वाढेल, असा दावा लोकशाहीनं निवडून आलेल्या नेत्या व नोबेल शांतता पुरस्कारविजेत्या आँग सान स्यू की यांनी केला. ऑगस्टमधील हिंसाचाराविषयी कित्येक दिवस मौन धारण केल्यानंतर अलीकडंच स्यू की यांनी या संदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. वांशिक हिंसाचार होत असल्याच्या वार्ता चुकीच्या आहेत, त्यातून 'दहशतवादांच्या हितसंबंधां'ना चालना मिळते आहे, आणि अशातून समुदायांमधील शत्रुभाव आणखी वाढेल, असे त्या म्हणाल्या.

भारत सरकारचा या समस्येवरचा प्रतिसाद लाजीरवाणा राहिला आहे. देशाच्या विविध भागांमध्ये ४० हजार रोहिंग्या बेकायदेशीररित्या राहात आहेत, असा दावा भारत सरकारनं केला आहे; आणि त्यांना परत म्यानमारमध्ये पाठण्याचा विचार असल्याचंही सरकारनं म्हटलं आहे. केंद्रीय गृह राज्य मंत्री किरेन रिजिजू यांनी सरकारच्या भूमिकेचं समर्थन केलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासितांविषयीच्या नियमावलीवर भारतानं स्वाक्षरी केलेली नाही, त्यामुळं रोहिंग्या समस्येवरील संयुक्त राष्ट्रांच्या मतांचं बंधन भारताला नाही, असं रिजिजू म्हणाले. परंतु अत्याचारापासून दूर जाण्यासाठी आलेल्या निर्वासितांना सक्तीनं परत मायदेशात पाठवण्याला सर्वोच्च न्यायालयानं व उच्च न्यायालयांनी अनेक प्रसंगी थोपवलं आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यातील या प्रस्थापित वर्तनतत्त्वाकडं विद्यमान भारत सरकार दुर्लक्ष करू शकत नाही. सरकारच्या रोहिंग्यांना परत पाठवण्याच्या योजनेविरोधातील याचिकेची सुनावणी सध्या सर्वोच्च न्यायालयामध्ये सुरू आहे.

'भारतीय नागरिकत्व अधिनियम, १९५५'मध्ये दुरुस्ती करण्याचा विद्यमान सरकारचा प्रयत्न याहून अधिक संकटसूचक आहे. आश्रयाची याचना करणाऱ्या मुस्लिमांविरोधात सक्रिय भेदभाव करून इस्लामविषयक भयगंडाला संस्थात्मक स्वीकार मिळण्याचा धोका यात आहे. राज्यघटनेतील अनुच्छेद १४मध्ये समतेच्या अधिकाराची हमी देण्यात आली आहे, त्याला छेद जाणारी ही प्रस्तावित दुरुस्ती आहे. शिवाय नैतिकदृदृष्ट्याही तिचा बचाव करता येत नाही.

स्रोतविषयक कमतरता किंवा निर्वासितांमुळं देशात दहशतवाद्यांचा वावर वाढेल हा कल्पित धोका- अशी कारणं देऊन जनसंहाराकडं नुसतं पाहात राहाणं योग्य नाही, हे सरकारच्या लक्षात आणून देण्यासाठी अशा प्रकारच्या निषेधांची तीव्रता वाढवण्याची गरज आहे. मरण आणि अत्याचार यांपासून पळत असलेल्या लोकांना आसरा देणं हे अग्रक्रमाचं कृत्य असायला हवं. असा आसरा देताना त्यांचा धर्म, पंथ, वंश किंवा वांशिकता यांनुसार अटी घालणं योग्य नाही. बेघर झालेल्या समुदायांना त्यांच्या मायदेशामध्ये किंवा मायदेशातील परिस्थिती राहाण्यायोग्य नसल्यास ते ज्या देशात आले आहेत त्या देशामध्ये त्यांचं पुनर्वसन करण्यासाठी जागतिक पातळीवर स्रोतांना चालना द्यायला हवी. अडचणीच्या काळात सहकार्य नाकारून लोकांना मृत्यूच्या दाढेत ढकलणं अस्वीकारार्ह आहे. ●

**वाटसरूचे अंक आपल्याला सॉफ्ट स्वरूपातदेखील मिळू शकतात. वार्षिक वर्गणी ३५० रु. फक्त.**
**संपर्क** : **भ्र. ७७७६९०२२६७ इमेल** : pwatsaru@yahoo. com **संकेतस्थळ** : www.pvatsaru.com

# विपर्यस्त स्वातंत्र्य

*सत्ताधाऱ्यांची तुम्ही सहमत असाल तर तुम्हाला काहीही बोलायचं स्वातंत्र्य आहे.*

भारतीय नागरिकांना टीका करण्याचं स्वातंत्र्य विद्यमान सरकारच्या विशेष उपकारामुळं मिळालेलं नाही. राज्यघटनेतील अनुच्छेद १९(१)(ए)मध्येच या स्वातंत्र्याची हमी देण्यात आलेली आहे. परंतु, नवी दिल्लीत सत्तेवर असलेल्यांच्या अलीकडच्या कृती आणि उक्ती यांमधून असा निष्कर्ष निघतो की, टीका करण्याचं स्वातंत्र्य केवळ सरकारला पाठिंबा देणाऱ्यांना आणि सरकारच्या राजकीय विचारधारेचं समर्थन करणाऱ्यांनाच आहे. असं समर्थन न करणारेही स्वतःला हवं ते बोलू शकतात, पण मग त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतील. हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावरील गंभीर हल्ला आहे, असं तुम्ही म्हणालात, तर असल्या कुठल्या हल्ल्याचा काहीच पुरावा नसल्याचं तुम्हाला सांगितलं जातं. मोजक्या लेखकांच्या किंवा विख्यात पत्रकारांच्या हत्या, किंवा टीका करणाऱ्या व्यक्तींविरोधात दाखल झालेले राष्ट्रद्रोहाचे व मानहानीचे खटले, अशा घटनांना अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ला मानू नये, असं सांगितलं जातं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी अभिव्यक्ती स्वातंत्र्याला इतके कटिबद्ध आहेत की समाजमाध्यमांवर त्यांना 'फॉलो' करणाऱ्या कोणालाही ते प्रतिबंध करत नाहीत. गौरी लंकेशसारख्या पत्रकर्तीची ५ सप्टेंबर रोजी हत्या झाल्यानंतर काही तासांच्या आत लंकेश यांच्याबद्दल अतिशय हीन व अश्लाघ्य भाषेत मजकूर प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीलाही मोदी समाजमाध्यमांवर दूर ठेवत नाहीत, इतकं त्यांचं अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर प्रेम आहे! लंकेश यांच्या हत्येनंतर ६ सप्टेंबरला इतिहासकार व लेखक रामचंद्र गुहा यांनी केलेल्या विधानांबद्दल कर्नाटक भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) युवा मोर्चानं त्यांना फौजदारी व नागरी मानहानीसाठीची कायदेशीर नोटीस पाठवली, तरीही यातून अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयीची असहिष्णूता दिसत नाही, असं मानायचं! 'स्क्रोल' (scroll.in) या संकेतस्थळाला दिलेल्या मुलाखतीत गुहा म्हणाले की, 'दाभोळकर, पानसरे व कलबुर्गी यांच्या मारेकऱ्यांप्रमाणे लंकेश यांचे मारेकरीही संघ परिवाराशी संलग्न असू शकतात.' या विधानामुळं भाजपची 'प्रतिमा आणि प्रतिष्ठा मलीन होते' आणि हे विधान 'दोषारोप करणारं असून मानहानीच्या स्वरूपाचं आहे', असा दावा या कायदेशीर नोटिशीमध्ये करण्यात आला आहे.

भाजपच्या सोईचं असेल तेव्हा तिरस्कारजन्य वक्तव्यांनाही मुभा देण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार वापरला जाईल, परंतु गुहा व असे इतर टीकाकार त्यांच्या मनातलं बोलून दाखवतील तेव्हा ते स्वातंत्र्याचं मर्यादोल्लंघन करत असल्याचं सुनावलं जाईल, अशी ही दुतोंडी भूमिका आहे. टीकाकारांच्या मुस्कटदाबीसाठी वापरल्या जाणाऱ्या दहशतीच्या साधनांपैकी फौजदारी मानहानीचा आरोप हे केवळ एक साधन आहे. भारतीय दंडविधानातील राष्ट्रद्रोहाशी संबंधित कलम १२४ए हे दुसरं एक साधन अनेकदा वापरलं जातं. 'द हूट' (thehoot.org) या संकेतस्थळाच्या आकडेवारीनुसार, २०१४ ते २०१६ या काळात राष्ट्रद्रोहाच्या खटल्यांची संख्या शून्यावरून अकरावर गेली आहे. तुलनेनं ही खटल्यांची संख्या लहान वाटू शकते. परंतु, यातला प्रत्येक खटला संभाव्य टीकाकारांसाठी धोक्याची घंटा वाजवणारा असतो. कायदेशीर प्रक्रियेचा शेवट ही यातली शिक्षा नसते, तर राष्ट्रवादाच्या आरोपाशी लढणं ही प्रक्रियाच शिक्षेसमान असते. मतभिन्नता दर्शवणाऱ्या किंवा विरोध करणाऱ्या व्यक्तींवर राष्ट्रद्रोहाचा आरोप करण्याचा हेतू हा असतो की, या मार्गानं जाणाऱ्या इतरांनी थांबून स्वतःच्या मतांचा पुनर्विचार करावा. व्यूहरचना आखून वापरली

जाणारी ही धमकावणीची पद्धत आहे आणि तिचा प्रभाव अधिकाधिक व्यापक असावा अशा दृष्टीनं लक्ष्यं निश्चित केली जातात.

एका मर्यादेपर्यंत ही व्यूहरचना परिणाम करते. काही तत्त्वनिष्ठ लोक आवाज उठवणं सुरू ठेवतात (२०१६ साली राष्ट्रद्रोहाचा आरोप झालेले जवाहरलाल नेहरू विद्यापिठातील विद्यार्थी याचं एक उदाहरण आहेत), परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्य अथवा मतभिन्नता या मुद्द्यांवर व्यापक जनआंदोलन मात्र उभं राहू शकत नाही. आपल्यावर थेट परिणाम होत नाही तोपर्यंत हे अधिकार गृहीत धरले जातात, त्यामुळं अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील निर्बंधांचा निषेध करत सर्वसामान्य लोकांनी रस्त्यावर उतरण्याची अपेक्षा करणं बहुधा अवास्तववादी ठरेल. त्यामुळं याबाबतचा रोष मुख्यत्वे विद्यार्थी, लेखक, पत्रकार आणि बुद्धिजीवी यांच्याकडून व्यक्त केला जातो. अर्थात, जूनमध्ये दिल्लीजवळ १६ वर्षांच्या जुनैद खानची जमावानं क्रूर हत्या केल्यानंतर विविध ठिकाणी असहिष्णूतेच्या निषेधार्थ निदर्शनं झाली होती, यावरून व्यापक समाजही अस्वस्थ असल्याचं दिसतं, हेही लक्षात घ्यायला हवं. शिवाय, गेल्या आठवड्यात शेकडो पत्रकारांनी आणि नागरी समाजातील इतर काहींनी गौरी लंकेश यांच्या हत्येचा निषेध केला होता, मतभिन्नतेच्या स्वातंत्र्यावरचा हा थेट हल्ला असल्याचं मत या निदर्शकांनी व्यक्त केलं होतं.

ही अलीकडची निदर्शनं आणि काही महिन्यांमध्ये कर्नाटकमध्ये होणार असलेल्या विधानसभेच्या निवडणुका, या पार्श्वभूमीवर गुहांसारख्या विख्यात व्यक्तिमत्वाविरोधात तक्रार दाखल करण्याची परवानगी भाजपनं कर्नाटकातील पक्षाच्या युवा मोर्चाला कशी दिली? हे दुःसाहस आहे, असं पक्षश्रेष्ठींना वाटलं नाही का? की, काही शहरांमधील निषेधाच्या निदर्शनांनी निवडणुकांच्या वेळी पक्षाच्या लोकप्रियतेला बाधा पोचणार नाही, असं त्यांना वाटतं? गुहांसारख्या विख्यात टीकाकारांविरोधातही अशी कठोर कृती केल्यास पक्षाचा निष्ठावान समर्थकवर्ग आणखी एकसंध होईल, असं कदाचित त्यांना वाटत असावं. समाजमाध्यमांवर दिसणारी संतप्तताही भाजपला निवडणुकीतील समीकरणांच्या दृष्टीनं निरर्थक वाटत असावी. त्यामुळं, समाजमाध्यमांवर विशिष्ट व्यक्तींना स्वतःच्या यादीत येण्यापासून पंतप्रधानांनी प्रतिबंध करावा, अशा मागण्या दूरचित्रवाणीवरच्या चर्चांमध्ये रोचक ठरत असल्या, तरी पक्षाच्या दृष्टीनं त्यांना फारसं महत्त्व नाही. किंबहुना, आपल्या टीकाकारांविरोधील भाजपची आक्रमक व्यूहरचना हुशारीनं आखलेली असू शकते. अशा योजनाबद्ध आक्रमकतेमुळं हे टीकाकार आणखी अलग पडतील आणि अखेर अप्रस्तुत ठरतील, असा उद्देश यामागं असू शकतो.

स्वातंत्र्याच्या अर्थाविषयी चिंतन करताना रोझा लक्झेम्बर्ग यांनी व्यक्त केलेले विचार समकालीन भारतामध्ये प्रस्तुत ठरणारे आहेत. त्या म्हणाल्या होत्या : स्वातंत्र्य हे नेहमी भिन्न विचार करणाऱ्याचं स्वातंत्र्य असतं. न्यायाच्या एखाद्या कट्टरतावादी संकल्पनेमुळं नाही, तर राजकीय स्वातंत्र्यातील सर्व उद्बोधक, हितकारक व शुद्ध गोष्टी या आवश्यक गुणावर अवलंबून असतात म्हणून हे महत्त्वाचं आहे; आणि 'स्वातंत्र्य' हा जेव्हा एक विशेषाधिकार बनतो, तेव्हा त्याची परिणामकारकता संपुष्टात येते. आजच्या भारतामध्ये हेच आपल्याला हेच बघायला मिळतं आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा काही लोकांपुरता मर्यादित असा विशेषाधिकार राहिलेला आहे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करणारे निर्लज्जपणे स्वातंत्र्याचा व लोकशाहीचा मंत्र जपत असताना इतरांना मात्र हे स्वातंत्र्य नाकारलं जातं आहे. ●

# भाजपचा दुबळा दुवा

*सत्ताधारी भाजपनं ग्रामीण भागाकडं केलेलं दुर्लक्ष वित्तीय आणि राजकीयदृष्ट्या महाग पडतं आहे.*

राजस्थानात भारतीय जनता पक्ष (भाजप) सरकारकडून २०,००० कोटी रुपयांची शेतकी कर्जमाफी मिळवण्यात शेतकऱ्यांना यश मिळाले. गेल्या चार महिन्यांमध्ये अशा प्रकारे कर्जमाफी देणारे हे चौथे राज्य सरकार आहे. अशाच प्रकारची आंदोलनं भारताच्या इतर भागांमध्ये होण्याची शक्यता आहे. या राज्यांमधील वित्तीय आणि राजकीय दायित्व वाढतं आहे, या पार्श्वभूमीवर भाजपच्या महागड्या सुधारणांचा उलटा प्रवास सुरू झाल्याचं या घडामोडी सुचवत आहेत का?

राजस्थानातील शेखावती प्रदेशातील- मुख्यत्वे सिकर, झुनझुनू व चुरू या जिल्ह्यांमधील- शेतकरी १ सप्टेंबर २०१७ रोजी सिकर इथं एकत्र आले आणि त्यांनी अनिश्चित काळासाठी धरणं आंदोलन सुरू केलं. या प्रदेशातील शेतीला ग्रासून असलेल्या इतर समस्यांसोबतच निश्चलनीकरणामुळं खरेदी किंमती आकस्मिकरित्या घटल्या. हा प्रश्न मांडण्यासाठी जून २०१७पासून सुरू असलेले विविध प्रयत्न फसल्यानंतर शेतकऱ्यांनी रस्त्यावरील आंदोलनाचा मार्ग पत्करला. जिल्हा प्रशासन व राज्य सरकार यांनी आंदोलनकारी शेतकऱ्यांशी संवाद साधण्यास नकार दिला. उलट निदर्शनं उधळवून लावण्यासाठी आणि शेतकऱ्यांचं ऐक्य भंग पावावं यासाठी शासन-प्रशासन प्रयत्नशील होतं. पण सरकारी यंत्रणेच्या या कारवाया तिच्यावरच उलटल्या, आणि अखिल भारतीय किसान सभा व भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेलं आंदोलन अधिकाधिक तीव्र होत गेलं. या आंदोलनाची व्याप्ती वाढत गेली आणि त्यामध्ये सामान्य नागरिक, जिल्ह्यांच्या ठिकाणांमधल्या व्यावसायिक व्यक्ती व व्यापारी, विविध स्थानिक सेवादात्यांच्या संघटना आणि प्रचंड प्रमाणात महिला हे घटकही सहभागी झाले. छोट्या शहरांमध्ये आणि गावांमध्ये जमावबंदी लागू करण्यात आली आणि बंद पुकारण्यात आले. या वर्षीच्या पूर्वार्धात झालेल्या इतर काही शेतकऱ्यांच्या आंदोलनांपेक्षा राजस्थानातील आंदोलनाचे स्वरूप यामुळंच वेगळे राहिले; या आंदोलनात ग्रामीण भागातील सर्वच समाजघटकांना चेतना दिली. देशभरात दिसून येत असलेल्या ग्रामीण अशांततेच्या मालिकेसंदर्भातील ही महत्त्वाची फारकत आहे.

भाजपच्या सुधारणेच्या कार्यक्रमात ग्रामीण भारत क्वचितच ठळकपणे सामावलेला दिसतो. या पक्षाच्या राजकीय कृतीचा केंद्रबिंदू नागरी भाग हा आहे. पक्षाचा मुख्य कार्यकर्तावर्ग ब्राह्मण व बनिया जातींमधून आलेला आहे आणि भारतभरातील अनेक मोठ्या व लहान बाजारपेठीय शहरांवर त्यांचा प्रभाव आहे. २०१४पर्यंत या कार्यकर्तावर्गाला ग्रामीण जनतेशी संपर्क साधण्याबाबत मर्यादित यश आलं होतं आणि त्या वर्षीच्या निवडणुकीत नरेंद्र मोदींच्या लाटेमुळं ग्रामीण भागांतील मतंही निर्णायकरित्या भाजपच्या पारड्यात गेली. परंतु, आता हा पाठिंबाही दूर होत असल्याचं दिसतं आहे. सुधारणांची आखणी करताना वा अंमलबजावणी करताना ग्रामीण जनता ही भाजपसाठी कधीच अविभाज्य घटक नव्हता, त्यामुळं हे घडत असावं.

उदारीकरणाला २७ वर्षं होऊन गेल्यानंतरही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य भर शेतीवरच आहे. अर्थव्यवस्थेचे रचनात्मक परिवर्तन झाले असले तरी देशातील श्रमशक्तीमध्ये हे परिवर्तन घडलेलं नाही. देशातील ६० टक्के श्रमशक्ती अजूनही शेतीमध्ये गुंतलेली आहे आणि सकल घरेलू उत्पन्नामध्ये त्यांचं योगदान १५ टक्क्यांपेक्षा जास्त नाही. शेतीबाह्य क्षेत्रांमधील

रोजगारनिर्मितीची वानवा, ग्रामीण भागांमधील अपुरा पायाभूत विकास आणि राज्यसंस्थेच्या सामाजिक सुरक्षेचे आकुंचित होत असलेलं आवरण यांमुळं मोठ्या प्रमाणावर श्रमशक्ती शेतीमध्ये व पूरक सेवांमध्ये अडकून पडली आहे. या पार्श्वभूमीवर शेतीकडं दुर्लक्ष करणं म्हणजे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला दुर्लक्षिणं आहे.

गोहत्याबंदी, निश्चलनीकरण आणि वस्तू व सेवा कर (जीएसटी : गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स) या भाजपच्या अलीकडच्या तीन धोरणांचा शेतकऱ्यांना आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला थेट फटका बसला आहे. एक : निश्चलनीकरणामुळं शेती बाजारपेठा आणि शेतकऱ्यांसाठी सर्वांत महत्त्वाची असलेली रोकडसुलभताच नष्ट झाली. जास्त पीक आलेल्या वर्षातील या निर्णयामुळं शेतीउत्पादनांच्या किंमतींमध्ये स्थिर गतीनं घट होत गेली, आणि शेतकऱ्यांना अचंबित प्रमाणात उत्पन्न तुटवडा सहन करावा लागला, त्यामुळं पुढील मोसमासाठी पेरणीची क्षमता कमी झाली. देशभरात होत असलेल्या कर्जमाफीच्या मागणीमागची पार्श्वभूमी अशी आहे. अर्थात, कर्जमाफीसारख्या निर्णयांनी केवळ पुढील मोसमात नवीन कर्ज घेण्यासाठी शेतकऱ्यांना मार्ग राहातो. दोन : तणावाच्या काळामध्ये गुरांची विक्री करून अल्पकालीन समस्या सोडवण्याचा मार्ग शेतकरी पत्करत असतात. परंतु गोहत्याबंदी, गोमांसविक्रीवर बंदी आणि गोरक्षकांचा मुक्त अंमल यांमुळं ही बाजारपेठ जवळपास कोलमडून पडली आहे. गायी सांभाळण्याच्या किंमतीमुळं पिकांची नासधूस करणाऱ्या मोकाट जनावरांची संख्या वाढली आहे. राजस्थानातील शेतकऱ्यांनी केलेल्या मागण्यांच्या यादीत ही तक्रारही आहे. तीन : जीएसटीमुळं लहान व्यवसायांवर आणि सेवादात्यांवर कुऱ्हाड कोसळली, त्यामुळं शेतीबाह्य क्षेत्रांमधील व्यक्तींचा राजस्थानातील शेतकरी आंदोलनामधला सहभाग वाढला. शिवाय, जीएसटीमुळं शेतकी कच्च्या मालाचे भावही गरीब शेतकऱ्यांना परवडणार नाहीत इतके वाढले. वर उल्लेख केलेल्या सुधारणांच्या बाबतीत बहुसंख्याकांच्या चर्चाविश्वामध्ये भाजपचा विजय झाल्यासारखं दिसत असलं तरी नव्यानं समोर येत असलेल्या भौतिक परिणामांमुळं या विजयी घोषणाबाजीला व्यस्त स्वरूप प्राप्त होईल.

पंजाब व उत्तर प्रदेश इथली कर्जमाफी संबंधित राज्यांमधील विधानसभा निवडणुकांच्या काळातील आश्वासनांचा भाग म्हणून देण्यात आली. हे दोन अपवाद वगळता इतर ठिकाणी ग्रामीण-शेतकरी जनतेमध्ये चेतना जागवून त्यांच्या आंदोलनांचं प्रतिनिधित्व करणारा एकमेव विरोधी पक्ष भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हा आहे. महाराष्ट्र व राजस्थान इथं सामूहिक संपांमध्ये, मागण्या मांडण्यामध्ये आणि राज्य सरकारांसोबत शेतकऱ्यांच्या वतीनं वाटाघाटी करण्यामध्ये अखिल भारतीय किसान सभा आघाडीवर आहे. आता हरयाणामध्येही निदर्शनं सुरू करण्याची योजना या संघटनेनं आखली आहे. असंघटित, अनौपचारिक रोजगाराच्या काळामध्ये श्रमिकांच्या मागण्यांसाठी राज्यसंस्थेला आव्हान देण्याकरिता पारंपरिक कामगार आंदोलनांचं पुनरुज्जीवन होणं ही दिलासादायक घडामोड आहे. या घटनांचं रूपांतर राजकीय लाभामध्ये करणं आणि निवडणुकांमधील आपली ढासळती पत पुन्हा मिळवणं, हे भारतातील डाव्यांसमोरचं आव्हान आहे. दुसरीकडं, 'नवभारता'च्या चित्रामध्ये ग्रामीण भागाला सामावून घेणं, हे भाजपसमोरचं आव्हान आहे. ●

***'वाटसरू'ची वर्गणी द्यायची आहे असं नुसतं मनात वाटून उपयोगाचं नाही. त्यासाठी एक पाऊल पुढे टाकावंच लागेल. वर्गणीसंदर्भात आमच्या कार्यालयाशी पुढील क्रमांकावर संपर्क साधा. भ्र. ७७७६९०२२६७***

# चुकीच्या वेळी केलेला हस्तक्षेप

*भांडवलाची निकड असलेल्या सरकारी बँकांचं विलीनीकरण केल्यानं समस्या आणखी चिघळेल.*

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँका कर्जाखाली दबल्या आहेत आणि कंपन्यांना स्वतःच्या तणावग्रस्त ताळेबंदांमुळं (याला दुहेरी ताळेबंदाची समस्या असंही म्हणतात) कर्ज फेडण्याची इच्छा नाही वा क्षमता नाही. अशा वेळी केंद्रीय मंत्रिमंडळानं गेल्या महिन्यात सरकारी बँकांचं विलीनीकरण वेगानं व्हावं यासाठी 'पर्यायी यंत्रणे'ची घोषणा केली. बँकांच्या मंडळांकडून विलीनीकरणासाठी आलेल्या प्रस्तावांना तत्त्वतः मंजुरी देण्याचं काम या यंत्रणेकडून होईल. हा धोरणात्मक प्रस्ताव अतिशय चुकीच्या वेळी ठेवण्यात आला आहे. भारतातील बँकिंग क्षेत्राला सध्या कर्जफेडीच्या तरतुदीची आणि कंपन्यांकडून थकित व्याज मिळवण्याची, आणि कर्ज देण्याची क्षमता पुनर्स्थापित होण्यासाठी भांडवल उभं करण्याची चिंता सर्वाधिक सतावते आहे. यातूनच त्यांना अर्थव्यवस्थेमध्ये गुंतवणूक करता येणार आहे. सरकारी बँकांचं विलीनीकरण करण्यासाठी तातडीची यंत्रणा उपयोगी पडणार नाही. उलट, आत्ताच्या वेळी असं पाऊल उचलल्यास विलीन झालेल्या बँकांना फारसं काही हाती लागणार नाहीच, फक्त तणावग्रस्त संपत्तीचं केंद्रीकरण होण्याचाच धोका आहे.

विलीनीकरण यशस्वी होण्यासाठी इतर गोष्टींसोबतच योग्य वेळ साधणंही महत्त्वाचं असतं. तणावग्रस्त संपत्तीखाली दबलेल्या दोन बँकांना एकमेकांमध्ये विलीन केल्यानं केवळ वाढलेला ताळेबंदच तयार होईल असं नव्हे, तर तणावग्रस्त संपत्तीचं प्रमाणही वाढेल. विलीन झालेल्या बँकांची आर्थिक परिस्थिती कशी सुधारेल, हे स्पष्ट नाही. त्यांचा संयुक्त ताळेबंद मोठा होईल, परंतु तो काही सुधारणेचा संकेत मानता येणार नाही. अशा वेळी तणावग्रस्त संपत्तीचं केंद्रीकरण करणं कितपत उपयुक्त ठरेल? मुख्य म्हणजे यातून बँकांना गरजेच्या असलेल्या भांडवलाची निकड कशी कमी होईल?

उदाहरणादाखल या वर्षी भारतीय स्टेट बँकेच्या (एसबीआय: स्टेट बँक ऑफ इंडिया) सहायक बँकांसोबत करण्यात आलेल्या विलीनीकरणाकडं पाहाता येईल. त्यांचा संयुक्त ताळेबंद मोठा झाला, परंतु बुडित संपत्तीचं प्रमाणही प्रचंड वाढलं. सहायक बँकांना एसबीआयमध्ये विलीन करण्याचा हा पर्याय १९९१पासून विचाराधीन होता. संस्थानी राज्यांनी स्थापन केलेल्या आणि स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीयीकरण झालेल्या सात सहायक बँकांना एसबीआयमध्ये टप्प्याटप्प्यानं विलीन करावं, असा प्रस्ताव नरसिंहम समितीनं त्या वेळी ठेवला होता. सहायक बँकांकडील निष्क्रिय संपत्ती कमी असेल अशी वेळ येण्याची वाट पाहाणं एसबीआयच्या हिताचं ठरलं असतं. एसबीआयचा २०१६-१७ या वर्षातील निव्वळ नफा हा तिच्यात विलीन झालेल्या पाच सहायक बँकांच्या संयुक्त तोट्यापेक्षा कमी होता. इतर सरकारी बँकांना विलीनीकरणाची ही किंमत मोजणं कदाचित परवडणार नाही, कारण त्या एसबीआयइतक्या मोठ्या नाहीत. हे एक विशेष प्रकरण होतं आणि दोन संबंध नसलेल्या बँकांच्या संभाव्य विलीनीकरणाइतकं हे प्रकरण गुंतागुंतीचं नव्हतं.

एसबीआय समूहाचा लोगो आणि ब्रँडिंग समान आहे आणि त्यांची माहिती-तंत्रज्ञानाची पायाभूत रचनाही समान आहे. या समूहाची शासनरचना आधीपासूनच केंद्रीकृत होती, त्यामध्ये सहाय्यक बँकांशी संबंधी कळीच्या मुद्द्यांवर एसबीआयचा निर्णय महत्त्वाचा ठरत असे. तरीही, या विलीनीकरणातून ज्या व्यवहारवाढीचं आश्वासन मिळतं आहे तिचे संभाव्य लाभ प्रत्यक्षात येण्यासाठी कर्मचारीवर्ग आणि शाखांचं जाळं उत्पादकतेनं वापरावं लागेल. ही दीर्घ काळ वाट पाहायला लावणारी प्रक्रिया आहे. संस्थात्मक

संस्कृतीचाही विचार करावा लागेल आणि या अवघड प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वेळ आणि पुरेसं लक्ष देणं गरजेचं आहे. शिवाय, १९९१नंतरच्या काळात झालेली सरकारी बँकांची– आणि इतरही बँकांची– विलीनीकरणं प्रत्येक वेळी अधिक कार्यक्षम संस्थेला जन्म देणारी ठरलेली नाहीत.

दुहेरी ताळेबंदाची समस्या ही सरकारी बँकांच्या व त्यांच्या व्यवस्थापनाच्या भ्रष्ट आणि अकार्यक्षम असण्याची निदर्शक आहे, असं अनेकदा म्हटलं जातं. या स्पष्टीकरणात काही अंशी तथ्य असेलही. पण सरकारी मालकीच्या बँकांनी वित्तपुरवठा केलेले बहुतांश उद्योग सुरुवातीला अव्यवहार्य नव्हते, त्यांची वाईट कामगिरी बँकांच्या नियंत्रणाबाहेरची होती. गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराची प्रकरणं निश्चितपणे होती, परंतु ते यामागील मुख्य कारण नाही. बड्या प्रकल्पांसाठी दीर्घ मुदतीची कर्जं देणाऱ्या विकास वित्तपुरवठा संस्थांची जागा व्यावसायिक बँका घेऊ लागल्या. २०००च्या सुरुवातीला बहुतांश विकास वित्तपुरवठा संस्थांनी कर्ज देणं थांबवलं, अशा संस्था बंदच पडल्या किंवा त्यांचं रूपांतर व्यावसायिक बँकांमध्ये झालं. वित्तीय निर्बंधमुक्तीचा हा परिणाम होता. दीर्घ मुदतीच्या प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यामध्ये व्यावसायिक बँका उतरल्या. २०००च्या दशकाच्या मध्यावर आलेल्या तेजीला त्यांनी कर्जपुरवठा केला. परंतु आता दिसत असलेल्या परिणामानुसार यातून नफा घटला आणि मोठ्या प्रमाणात निष्क्रिय संपत्ती निर्माण झाली.

कर्ज परतावा करून घेण्यासाठी आणि त्याची पुनर्रचना करण्यासाठी काही बँकांनी प्रयत्न केले होते. कर्जबुडवेगिरीच्या अनेक प्रकरणांमध्ये कालबद्ध 'बुडितखोरी आणि दिवाळखोरी नियमावली, २०१६' अंतर्गत प्रक्रिया सुरू आहेत. विशिष्ट कर्ज खात्यांविरोधात कार्यवाही करावी अशी सूचना भारतीय रिझर्व बँकेनं बँकांना केली आहे. बँकांनी संपत्तीवर नियंत्रण घ्यायचा प्रयत्न केल्यावर त्याविरोधात काही कर्जदारांनी कायदेशीर पावलं उचलली आहेत. दरम्यान, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा भांडवलपुरवठा वाढवण्यासाठी अधिक वाटप करण्याशिवाय दुसरा पर्याय सरकारकडं उरणार नाही.

सरकारनं आत्तापर्यंत काय केलं? मार्च २०१४मध्ये सूचीत व्यावसायिक बँकांसाठी (खाजगी व सरकारी दोन्ही प्रकारच्या बँका) एकूण आगाऊ रकमांपैकी सकल निष्क्रिय आगाऊ रकमांचं प्रमाण चार टक्के होतं. या वर्षीच्या मार्च महिन्यात हे प्रमाण ९.५ टक्के किंवा ७.२८ लाख कोटी रुपये होतं. नरेंद्र मोदी सरकारनं ऑगस्ट २०१५मध्ये जाहीर केलेलं 'इंद्रधनुष अभियान' म्हणजे '१९७०च्या बँकिंग राष्ट्रीयीकरणानंतरचा सर्वाधिक सर्वांगीण स्वरूपाचा सुधारणेचा प्रयत्न' असल्याचं सांगितलं गेलं. त्यातून काही दिलासा मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु दोन वर्षं होत आली तरी असा काहीही दिलासा मिळालेला नाही. बँकांचा भांडवलपुरवठा पूर्ववत करण्यावर आणि सरकारी बँकांच्या व्यवस्थापकीय मंडळांवर नियुक्तीसाठी स्वतंत्र प्रक्रिया प्रस्थापित करण्यावर या अभियानाचं मुख्य लक्ष होतं. चार वर्षांच्या कालावधीमध्ये ७०,००० कोटी रुपयांचं टप्प्याटप्प्यानं झालेलं वाटप पुरेसं ठरलेलं नाही. अनेकांनी ही भीती घोषणेच्या वेळीच व्यक्त केली होती. या वर्षी आणखी वाटप करण्याची इच्छा अर्थ मंत्रालयानं व्यक्त केली होती (काहींनी याला 'इंद्रधनुष २.०' असं संबोधलं), परंतु, आत्तापर्यंत १०,००० कोटी रुपयांचं वाटप झालं आहे. भांडवलपुरवठा पूर्ववत करण्यासाठी वाटप गरजेचं आहे का, हा प्रश्नच उचित नाही. हे वाटप कधी करायचं, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आणि ही वेळ आत्ताच साधायला हवी. ●

# धरण आणि सत्योत्तरता

*सरदार सरोवर धरण हे अन्याय्य आणि अशाश्वत विकासाचं उदाहरण आहे.*

गुजरातमधील बहुउद्देशीय सरदार सरोवर धरणाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या ६७व्या वाढदिवशी- १७ सप्टेंबरला केलं. मोदींनी या वेळी केलेली विधानं सत्योत्तरता व पर्यायी वस्तुस्थितींच्या सद्यकाळात आश्चर्यकारक ठरणार नाहीत. या धरणाचा तीन दशकांहून अधिक काळ व्यापणारा गुंतागुंतीचा व वादग्रस्त इतिहास निखालसपणे बाजूला सारत मोदींनी दावा केला की, जागतिक बँक सोबत असो वा नसो, आपण हा प्रकल्प पुढं न्यायचाच, असा निर्णय मी घेतला होता. वस्तुस्थिती मात्र याहून भिन्न आहे. जागतिक बँकेनं आश्वासन मोडत वित्तपुरवठा थांबवल्यानंतर 'गुजरातमधील मंदिरां'कडून या प्रकल्पाच्या मदतीसाठी देणग्या मिळाल्याचा दावाही त्यांनी केला. पुन्हा एकदा त्यांनी सत्याचा अपलाप केला.

नर्मदा नदीवर बांधण्यात येत असलेल्या ३० मोठ्या, १३५ मध्यम आणि ३,००० लहान धरणांपैकी एक असलेल्या सरदार सरोवर धरणाला मंदिरांनी निधी पुरवलेला नाही. या प्रकल्पासाठी ३० कोटी डॉलरांचं कर्ज जागतिक बँकेनं देऊ केलं होतं, परंतु १९९३ साली त्या कर्जाचा शेवटचा हफ्ता देण्यापूर्वीच बँकेनं या प्रकल्पातून माघार घेतली. त्यानंतर सरकारी निधीमधून हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. जागतिक बँकेनं माघार घेण्यामागचं कारण आणि धरणाविरोधात लोकांनी केलेला संघर्ष यातून या प्रकल्पाच्या इतिहासाचं कथन उभं राहातं. वरपांगी सजावट न करता हा इतिहास आपण लक्षात ठेवायला हवा, आणि भारतानं पुढचा प्रवास करताना या इतिहासातून मिळालेले महत्त्वाचे धडे ध्यानात घ्यायला हवा. परंतु हा सर्व इतिहास म्हणजे प्रकल्पाविरोधातील 'गैरमाहितीचं प्रचंड अभियान' होतं असे शब्द मोदींनी वापरले. सत्ताधारी पक्ष कोणताही असो, पण जबाबदार, समतापूर्ण आणि शाश्वत विकासाचा संदेश अजून सत्तास्थानी असलेल्यांपर्यंत पोचलेला नाही, हे यातून पुन्हा सिद्ध झालं.

जागतिक बँकेनं या प्रकल्पाचं स्वतंत्रपणे मूल्यांकन केल्यानंतर कर्जपुरवठ्यातून माघार घ्यायचा निर्णय घेतला होता. या प्रकल्पाशी संबंधित पुनर्वसनविषयक आणि पर्यावरणविषयक तरतुदी 'बँकेच्या धोरणांनुसार हाताळल्या जात नाहीत', असा निष्कर्ष या मूल्यांकनात काढण्यात आला. यामुळं प्रकल्पातून माघार घेण्याशिवाय दुसरा पर्याय बँकेसमोर उरला नाही. या प्रकल्पामुळं विस्थापित होणाऱ्यांचे प्रश्न मांडणारं नर्मदा बचाव आंदोलन आणि इतर प्रकल्पविरोधकांनी मांडलेल्या प्रश्नांचं प्रतिबिंबही या मूल्यांकनात पडलं होतं. किंबहुना, जगभरातील विविध प्रकल्पांबाबत अशा प्रकारच्या गंभीर शंका उपस्थित करण्यात आल्या, त्यातून बड्या धरणांविषयी गंभीर पुनर्विचार सुरू झाला आणि १९९८ साली धरणांविषयीच्या जागतिक आयोगाची स्थापना झाली. तेव्हापासून अशा प्रकल्पांचा निधिपुरवठा क्षीण होत गेला आहे, कारण या प्रकल्पांच्या नुसत्या व्याप्तीनंच मोठ्या प्रमाणावर सामाजिक व पर्यावरणीय समस्या निर्माण होत असल्याचं आता मान्य करण्यात आलं आहे.

जवाहरलाल नेहरूंनी १९६१ साली सरदार सरोवर प्रकल्पाची पायाभरणी करताना धरणांना आधुनिक भारताची 'मंदिरं' संबोधलं होतं, पण 'अवाढव्यते'विषयीच्या या नादाविषयी काही साशंकता व्यक्त करायलाही त्यांनी सुरुवात केली होती. प्रकल्प जितका मोठा असेल, तितकी त्यातील गुंतवणूक मोठी राहील आणि लाभही तितकेच मोठे असतील, असं त्या काळी गृहीत धरलं जात होतं. परंतु, १९८७

साली सरदार सरोवरासाठीचं बांधकाम सुरू झालं तोपर्यंत या विचाराला आव्हान दिलं जात होतं. अशा प्रकल्पांसाठी मोजाव्या लागणाऱ्या सामाजिक व पर्यावरणीय किंमतीविषयी साधारण प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले. सरदार सरोवराचं १३८.६८ मीटर उंचीचं महाकाय बांधकाम होत असल्याच्या तीन दशकांच्या काळामध्ये या प्रश्नांना अधिकाधिक वैधता प्राप्त झाली. किंमत-लाभ हे गणित केवळ आकडेवारीशी संबंधित नाही, तर लोकांना आणि पर्यावरणाला मोजाव्या लागणाऱ्या किंमतीविषयीही चर्चा गरजेची आहे.

या प्रकल्पामध्ये कितीही चढउतार आले असले तरी आपल्यामुळं तो पूर्ण झाला, यावर लोकांनी विश्वास ठेवावा अशीही मोदींची इच्छा आहे. गुजरातचे मुख्यमंत्री असताना मोदींनी सरदार सरोवर प्रकल्पाला गुजराती अस्मितेचा मुद्दा बनवलं, आणि प्रकल्पाच्या प्रत्येक टीकाकाराला गुजरातविरोधक ठरवण्यात आलं, हे खरं आहे; पण केंद्रातील विविध सरकारांनीही 'अवाढव्य ते सुंदर' ही संकल्पना स्वीकारलेली असल्यामुळंच हा प्रकल्प पुढं जाऊ शकला, ही वस्तुस्थिती आहे. नर्मदा बचाव आंदोलनानं कित्येक वर्षं निदर्शनं केली, पुनर्वसनाविषयीच्या अपुरेपणाबद्दल सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका करण्यात आल्या, तरीही नर्मदा नियंत्रण प्राधिकरणानं हा प्रकल्प पूर्ण करण्याला हिरवा कंदील दिला. भारतीय जनता पक्षाचा (भाजप) २०१४च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये विजय झाल्यानंतर काही महिन्यांमध्येच प्राधिकरणानं हा निर्णय घेतला. तोपर्यंत या धरणाची उंची १२१.९२ मीटर होती. या उंचीचं बांधकाम होत असतानाही हजारो कुटुंबांनी पुनर्वसनासंदर्भात आंदोलनं केली. असं असतानाही सध्याच्या १३८.६८ मीटर पातळीपर्यंत बांधकामाला नर्मदा नियंत्रण प्राधिकरणानं संमती कशी दिली हे गूढच राहातं. अर्थात, आपणच यासाठी पुढाकार घेतल्याचं मोदी सुचवत असतील तर मात्र त्यात गूढ असं काहीच नाही. हा निर्णय 'घाईगडबडीत घेतलेला, असमंजस व विध्वंसकारी' आहे, अशी टीका अकादमिक अभ्यासकांनी, पाणीतज्ज्ञांनी व कार्यकर्त्यांनी केली होती.

सरदार सरोवर आणि नर्मदा नदीवरील इतर धरणांविषयी मोठ्या प्रमाणावर लेखन झालेलं आहे. या प्रकल्पाशी संबंधित गुजरात, महाराष्ट्र व मध्यप्रदेश या सर्वच राज्यांमध्ये पुनर्वसनाविषयीची धोरणं अपुरी असल्याची नोंद अभ्यासांती करण्यात आलेली आहे. या प्रकल्पामुळं सर्वाधिक विस्थापन मध्य प्रदेशात होत असून विस्थापित कुटुंबांची संख्या अजून निर्विवादपणे स्पष्ट झालेली नाही. हिरावलं गेलेल्यांना रोख नुकसानभरपाई देऊन विस्थापितांसाठी 'जमिनीसाठी जमीन' द्यायचं धोरण अनिवार्य करणारा निवाडा नर्मदा पाणी वाद लवादानं केला होता. मध्य प्रदेश सरकारनं या निवाड्याला विरोध केला. परिणामी, आजही हजारो असमाधानी कुटुंब त्यांच्या पाण्याखाली गेलेल्या जमिनीसाठी न्याय्य भरपाई मिळावी म्हणून लढत आहेत. या प्रकल्पाच्या लाभांविषयी अतिशयोक्त दावे केले जात असले तरी सिंचन कालव्यांसारख्या बहुतांश पायाभूत रचनांचं बांधकाम अजूनही झालेलं नाही. आणि यातून होणाऱ्या आणखी विस्थापनाचं मोजमापही अजून झालेलं नाही. मोदींनी या धरणाचं वर्णन 'अभियांत्रिकीतील आश्चर्य' असं केलं. या 'आश्चर्या'साठी प्रचंड किंमत मोजावी लागली आहे, अनेक लोकांनी जमीन आणि उपजीविका गमावली आणि त्यांना कोणतेही लाभ मिळाले नाही. या पार्श्वभूमीवर, विस्थापित आदिवासींनी केलेल्या 'त्यागा'बद्दल त्यांचे आभार मानणाऱ्या मोदींनी पराकोटीच्या असंवेदनशीलतेचं प्रदर्शन मात्र केलं. ●

## एनईईटी व एकसाचीपणा

*राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नॅशनल एलिजिबिलिटी-कम-एन्ट्रन्स टेस्ट: एनईईटी) सक्तीची करणं भारताच्या बहुविधतेला दुर्लक्षणारं आहे.*

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नॅशनल एलिजिबिलिटी-कम-एन्ट्रन्स टेस्ट: एनईईटी) घ्यावी, असा आदेश सर्वोच्च न्यायालयानं २०१६ साली दिला होता. आधीचा, २०१३ सालचा निर्णय मागं घेत देण्यात आलेल्या या आदेशाचं अनेक कारणांमुळं स्वागत करण्यात आलं होतं. भारताच्या आरोग्यसेवेच्या गरजांचा विचार करता वैद्यकीय शिक्षणाची गरज मोठी आहे. सामायिक अखिल भारतीय परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी विविध परीक्षा द्याव्या लागणार नाहीत. शिवाय, ही परीक्षा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन : सीबीएसई) पर्यवेक्षणाखाली घेतली जाणार असल्यामुळं विविध त्रुटी दूर होतील आणि समान अभ्यासक्रमामुळं प्रत्येकाला आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी समभूमी प्राप्त होईल. परंतु, अतिशय वैविध्यपूर्ण आणि व्यामिश्र देशासाठी एकसाची उत्तर शोधण्याचा प्रयत्न एनईईटीमधून होत असल्याचं दिसून आलं आहे. या प्रक्रियेमध्ये राज्य पातळीवरच्या परीक्षा आणि प्रक्रिया पुसल्या जाणार आहेत. वास्तविकतः काही राज्यांमध्ये उच्चशिक्षण गरीबांना सहजी उपलब्ध होण्यासाठी या प्रक्रियांचा सकारात्मक परिणाम दिसून आला होता. एनईईटीमध्ये पास होण्यात अपयशी ठरल्यावर तामीळनाडूतील एका दलित मजुराची मुलगी एस. अनिता हिनं आत्महत्या केल्याची अलीकडची घटना या संदर्भात पाहावी लागेल.

'ख्रिश्चन मेडिकल कॉलेज व इतर विरुद्ध भारत सरकार' या खटल्यात २०१३ साली सर्वोच्च न्यायालयानं एनईईटीसंदर्भातील सरकारी सूचना रद्द केली होती, तेव्हा न्यायालयानं या निर्णयाच्या समर्थनार्थ दिलेली कारणं अजूनही प्रस्तुत आहेत. एनईईटीमुळं राज्यांना, राज्यांच्या विद्यापिठांना आणि सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना- यात धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांच्या संस्थाही आल्या- विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापासून वंचित राहावं लागेल, असं न्यायालयानं त्या वेळी म्हटलं होतं. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आणि सरकारी शाळांमधून व प्रादेशिक भाषांमधून शिकलेल्या विद्यार्थ्यांना एनईईटी अवघड जाईल, असंही न्यायालयानं म्हटलं होतं. किंबहुना, २०१३ साली आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, पश्चिम बंगाल व तामीळनाडू या राज्यांनी एनईईटीला कठोर विरोध केला होता. एनईईटीच्या विरोधकांनी व्यक्त केलेल्या इतर चिंताही परिचित असल्या तरी त्यावर उपाय करण्यात आलेला नाही. सीबीएसईचा अभ्यासक्रम शहरी भागांना केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला असतो, शिवाय राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांपेक्षा तो खूप वेगळाही असतो, त्यामुळं इतर अखिल भारतीय सामायिक प्रवेश परीक्षांप्रमाणे एनईईटीमध्येही महागड्या शिकवण्या परवडणाऱ्या विद्यार्थ्यांना यश मिळेल, असा युक्तिवाद एनईईटीचे विरोधक करतात. विशेष म्हणजे ऑल इंडिया इन्स्टीट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) आणि जवाहरलाल इन्स्टीट्यूट ऑफ पोस्ट-ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन अँड रीसर्च (जेआयपीएमईआर) यांसारख्या केंद्रीय वैद्यकीय संस्था एनईईटीच्या कक्षेमध्ये येत नाहीत, कारण त्यांच्या स्वतःच्या निराळ्या प्रवेश परीक्षा असतात.

विविध राज्य सरकारांना पुरेसं विश्वासात न घेता एनईईटीची सक्ती करण्याची घाई केंद्र सरकारनं का केली, हे अनाकलनीय आहे. शिक्षणाचा विषय केंद्र-राज्य यांच्या सामायिक यादीत येत असल्यामुळं हा

नियमभंग आणखीच गंभीर ठरतो. शिक्षण सामाजिकदृष्ट्या अधिक समावेशक बनवण्याबाबत इतर कोणत्याही राज्यापेक्षा बहुधा तामीळनाडूची कामगिरी अनुकरणीय ठरेल. २००७ सालापासून या राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांचे प्रवेश केवळ बारावीतील गुणांच्या आधारे देण्यात येत आहेत. शिवाय, वंचित जातींसाठीचं आरक्षणाचं धोरणही तामीळनाडूत निक्षून पाळलं जातं, त्यामुळं या समाजगटांमधून वैद्यकीय प्रवाहामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीयरित्या वाढली. बारावीच्या परीक्षेत उत्तम कामगिरी केलेली आणि सामायिक प्रवेश परीक्षेत अपयशी ठरलेली अनिता याच याचिकेत सहभागी होती. २०१७च्या सुरुवातीला राज्याच्या विधानसभेनं एनईईटीची सक्ती न करण्याचा आणि आपलेच धोरण सुरू ठेवायचा निर्णय एकमतानं घेतला. आपल्या राज्यातील वैद्यकीय विद्यार्थ्यांना एनईईटीला बसण्यापासून सूट मिळावी असा प्रस्तावित वटहुकूम राज्य सरकारनं काढला होता, त्याला या वर्षीच्या ऑगस्टमध्येच केंद्रीय कायदा मंत्रालयानं मंजुरी दिली. परंतु केंद्र सरकारानं वटहुकुमाला मंजुरी दिली नाही, त्यामुळे तामीळनाडू सरकारला दिलेले आश्वासन तुटले. एनईईटी लागू करणाऱ्या २०१६ सालच्या न्यायालयीन आदेशानंतर तामीळनाडू सरकारनं एनईईटीच्या अंमलबजावणीपासून एका वर्षाची सूट मिळावी अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. परंतु सर्वोच्च न्यायालयानं ही याचिका फेटाळली आणि केंद्रानंही राज्य सरकारला पाठिंबा दिला नाही. साहजिकपणेच विरोधी पक्षांनी भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) गरीबविरोधी, तामीळविरोधी भूमिकेचा धिक्कार केला आहे आणि अनितासारख्या विद्यार्थ्यांच्या बाजूनं उभं न राहिल्याबद्दल राज्य सरकारलाही दोष दिला आहे. राज्य परीक्षेतील निकालांची दखल घेण्यात आली असती, तर अनिता ही तिच्या समुदायातील पहिली डॉक्टर बनली असती.

काही सन्माननीय अपवाद वगळता सर्व वैद्यकीय महाविद्यालयं ही प्रत्यक्षात बनावट शिक्षकवर्गाची (म्हणजे केवळ कागदावरच पात्रता असलेल्या शिक्षकांची) पैसा कमवण्याची जाळी बनलेली आहेत, तिथं अपुऱ्या पायाभूत सुविधा असतात आणि अतिशय सुमार शिक्षण इथं दिलं जातं, अशी आता लोकांची साधार धारणा झालेली आहे. शिवाय, बनावट पदव्या वाटणाऱ्या बनवेगिरीचं प्रमाणही मोठं आहे (ही चिंता मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियानंही व्यक्त केलेली आहे). या गंभीर समस्या आहेत. त्याचसोबत अनेक वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये दलित आणि आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षकवर्गाकडून आणि उच्चजातीय सहाध्यायींकडून भेदभाव व मानहानी सहन करावी लागते, हेही तितकेच गंभीर मुद्दे आहेत. देशभरात प्राथमिक शिक्षणाला लागलेली कीड दूर केली जात नाही तोपर्यंत वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्रवेश पातळीवरची तथाकथित समभूमी निरुपयोगी आहे. बहुतांश राज्य सरकारांनी याकडं लक्ष देण्याची गरज आहे. आपल्या प्रदेशांमधील विद्यार्थ्यांचं 'संरक्षण' आपण करतो आहोत, असा दावा राज्य पातळीवरचे राजकारणी करतात, परंतु शाळांना व उच्चशिक्षणाला ग्रासून असलेल्या रचनात्मक समस्यांवर उपाय करण्याचं कष्टदायक काम मात्र क्वचितच त्यांच्याकडून होतं. आपले पदवीधर कोणत्या सामाजिक-आर्थिक वास्तवामध्ये ज्ञानाचं उपयोजन करणार आहेत, त्याची दखल वैद्यकीय शिक्षणात व प्रशिक्षणात घेतली जायला हवी, हे अधिक मूलभूत काम आहे. लोकानुनयी उपायांनी किंवा अनुत्सुक राज्यांना केंद्राचा निर्णय मानण्याची सक्ती करून हे प्रश्न सुटणार नाहीत. व्यामिश्रतेबाबत संवेदनशील असलेल्या आणि सामाजिकदृष्ट्या सर्वसमावेशक असलेल्या दृष्टिकोनातून सहमती निर्माण करणं या उपायांसाठी गरजेचं आहे.●

# मुक्त होण्यासाठी आंदोलन

बनारस हिंदू विद्यापिठात आंदोलन करत असलेल्या मुली अधिकारांच्या व्यापक मागणीचं प्रतिनिधित्व करत आहेत.

उच्चशिक्षण म्हणजे लग्नासाठीचं प्रमाणपत्र, असा दृष्टिकोन आजच्या तरुण भारतीय स्त्रियांचा नसल्याचं दिसतं. शिक्षणामुळं त्या प्रश्न विचारायला उद्युक्त होत असल्याचं दिसतं. आजच्या तरुणी आपल्या अधिकारांची मागणी करत रस्त्यावर उतरत आहेत, हातानं रंगवलेले फलक धरून घोषणा देत आहेत. शिक्षणाच्या प्रक्रियेनं हीच सजगता येणं अपेक्षित असतं. पण असे प्रश्न विचारल्याबद्दल त्यांची टिंगलटवाळीही केली जातेय, त्यांच्यावर टीका होतेय, आणि अगदी पोलीस बळाचा वापर करून त्यांना माघार घ्यायला लावत आहेत. एकशेएक वर्षांच्या बनारस हिंदू विद्यापिठात अलीकडं घडलेल्या घटनांचा क्रम असाच होता, आणि त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. झापडबंद विचार करणाऱ्यांनाच स्त्रियांच्या अशा प्रश्न विचारण्याबद्दल आक्षेप असू शकतो. सुमारे दहा हजार विद्यार्थिनी असलेल्या या केंद्रीय विद्यापिठाचे कुलगुरू गिरीशचंद्र त्रिपाठी हे अर्थातच या झापडबंद गटामध्ये मोडतात. नरेंद्र मोदी आणि दिल्ली व उत्तर प्रदेशातील विद्यमान सरकारांच्या वरकरणी विरोधात असलेल्या 'बाहेरच्यांनी घडवलेलं' हे आंदोलन असल्याची त्रिपाठींची धारणा आहे. 'असत्य हे सत्यासारखं दिसावं यासाठी प्रयत्नशील असलेल्या' बाहेरच्या घटकांचा प्रभाव 'निष्पाप व अपरिपक्व मनांवर' पडत असल्याचं वक्तव्य त्यांनी माध्यमांना दिलेल्या मुलाखतींमधून केलं होतं. बनारस हिंदू विद्यापिठाच्या आवारात २१ सप्टेंबर रोजी घडलेल्या लैंगिक विनयभंगाच्या घटनेच्या संदर्भात त्रिपाठींनी 'असत्य' हा शब्द वापरला. मुळात ही घटना गांभीर्यानं घेण्याऐवजी तक्रारदार मुलीलाच उशिरापर्यंत बाहेर राहिल्याबद्दल प्रश्न विचारण्यात आले. पीडितेलाच दोष देण्याचा आणि आंदोलनांकडं दुर्लक्ष करण्याचा हा प्रकार अपेक्षेप्रमाणेच घडलेला आहे. पण त्यात भर म्हणजे त्रिपाठी आणि विद्यापिठाच्या प्रशासनानं स्वतःची स्त्रीद्वेष्टी व पितृसत्ताक मनोवृत्ती या घटनाक्रमात उघड केली आहे. या मनोवृत्तीच्या लोकांकडून स्त्रियांना सामर्थ्य नाकारलं जातं आणि इतरांकडून वापरल्या जाणाऱ्या बाहुल्यांपुरतंच त्यांचं अस्तित्व मर्यादित केलं जातं.

बनारस हिंदू विद्यापिठातील स्त्रियांना कोणीही भडकावलं नव्हतं. विद्यापिठाच्या आवारातील विनयभंगाची ही काही पहिलीच घटना नव्हती, पण त्यातून विद्यापीठ प्रशासनाची जी वृत्ती पुन्हा दिसली, त्यामुळं विद्यार्थिनींमधील रोषाचा भडका उडाला. शिवाय, त्यांनी या पूर्वी वेळोवेळी केलेल्या इतर तक्रारींकडंही विद्यापिठानं असंच दुर्लक्ष केलेलं असल्यानं या आंदोलनातील रोषात भरच पडली. भारतभरातील इतर विद्यापिठांमधील विद्यार्थिनींकडून होत असलेल्या मागण्यांचे प्रतिध्वनीच या आंदोलनाद्वारे उमटले. २०१५ साली दिल्लीत 'पिंजरा तोड' या नावानं एक गट स्थापन झाला, तेव्हापासून कोलकाता, अलीगढ, मुंबई, कासरगोड, रायपूर, जम्मू व इतर ठिकाणच्या विद्यापिठीय विद्यार्थिनींनी विद्यापीठ प्रशासनाच्या स्त्रियांविषयीच्या वृत्तीवर प्रश्नचिन्हं उमटवली आहेत. स्त्री व पुरुष विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अधिकारांमध्ये समता नसल्याचा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला. मुलांना जास्त वेळ बाहेर राहाण्याची मुभा आहे, तर मुलींना वसतिगृहांमध्ये जवळपास कैद केल्यासारखं ठेवलं जातं. बनारस हिंदू विद्यापिठात तर संध्याकाळी सहाच्या आतच मुलींनी वसतिगृहात पोचणं बंधनकारक आहे. मुलांना इंटरनेट सहज उपलब्ध होतं, तर मुलींना त्यासाठी लढावं लागतं. वसतिगृहातील जेवणाच्या निवडीबाबतही

मुला-मुलींमध्ये भेद केला जात असल्याचं दिसतं.

बनारस हिंदू विद्यापिठामध्ये २१ ते २३ सप्टेंबर या दिवसांमध्ये जे काही घडलं ती सुटी घटना नाही. आपल्या विद्यापिठांमध्ये सुरू असलेल्या घुसळणीचाच तो एक भाग आहे. विद्यापिठांचं प्रशासन कसं असावं, याविषयीही काही महत्त्वाचे प्रश्न यातून उपस्थित होतात. शाळेत शिक्षक कायदा आखतात आणि विद्यार्थी नम्रतेनं त्याचं पालन करतात; आणि काही शिक्षण केंद्रांमध्ये शिक्षक आणि प्रशिक्षणार्थी यांच्यात परस्परांविषयी आदर असतो व वृद्धिंगत शिक्षणाच्या सामायिक ध्येयापर्यंत ते प्रवास करतात. यातील कोणता पर्याय विद्यापिठांनी स्वीकारावा, हा प्रश्न या घुसळणीतून उपस्थित होतो. पण जोपर्यंत आपली विद्यापिठं तरुण स्त्रियांना अजाण समजत राहातील आणि 'त्यांच्याच भल्यासाठी व संरक्षणासाठी' असंयुक्तिक वेळेपासून त्यांना वसतिगृहात बंद करून ठेवत राहातील, तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. आपल्याला असल्या संरक्षणाची गरज नसून आदर व समानता हवी आहे, असं स्त्रियांचं म्हणणं आहे. शिवाय, स्त्रियांसह सर्वांसाठीच विद्यापिठांची आवारं सुरक्षित असावीत, जेणेकरून सर्व मुलांना उपलब्ध सुविधांचा वापर करता येईल आणि केवळ लिंगभावात्मक भेदाच्या आधारे स्त्रियांना या सुविधांपासून वंचित राहावं लागू नये.

स्त्रियांच्या सुरक्षेचा मुद्दा त्यांच्याविरोधातील कठोर निर्बंधांसाठी वापरला जाणं योग्य नाही. सध्या बरंच बदनामी झालेलं जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्लीसारख्या स्त्रियांसाठी असुरक्षित मानल्या जाणाऱ्या शहरात आहे. परंतु, आदर व स्वायत्तता यांच्याद्वारे सुरक्षिततेचं व अभ्यासाचं वातावरण कसं निर्माण करता येतं, हे या विद्यापिठानं दाखवून दिलेलं आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापिठाचा दाखला सर्व विद्यापिठांमध्ये अनुसरता येणार नाही, हे खरं असलं तरी सुरक्षिततेविषयीच्या कालबाह्य संकल्पनांना विद्यार्थिनींशी सल्लामसलत करून बदलण्याची वेळ आलेली आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षेचं कारण देऊन 'संचारबंदी'ची वेळ ठरवली जाते, ग्रंथालय व इतर सुविधांची उपलब्धता नाकारली जाते, आणि स्त्री-पुरुष यांना भिन्न वागणूक देण्याचं समर्थनही केलं जातं. जागतिकीकरणानंतरच्या जगामध्ये तरुण-तरुणींना माहितीची उपलब्धता आहे, मोठं होत असताना त्यांना अधिकारांचीही जाणीव होत असते, अशा वेळी प्रतिगामी प्रवृत्ती स्वीकारार्ह ठरत नाहीत. विद्यापीठ ही काही राजकारण करायची जागा नसते, असा दावा बनारस हिंदू विद्यापिठाच्या कुलगुरूंनी केला होता. विद्यापिठांमध्ये येणारी तरुणाई काय विचार करते आहे, याचं आकलन या कुलगुरूंना अजिबातच नाही, हे यावरून दिसतं. खरं तर विद्यापिठं ही कायमच पारंपरिक व नवविचारी राजकारणाच्या प्रयोगशाळा राहिलेल्या आहेत. ज्ञानाच्या शोधात असलेल्यांना प्रश्न विचारण्याचा व मतं मांडण्याचा अधिकार नाकारणं, हे अख्ख्या पिढीवर 'घोका व ओका' शिक्षणपद्धतीची सक्ती करण्यासारखंच आहे. 'नवीन' भारताच्या महारचनेमध्ये बसू शकतील अशा यंत्रमानवांचं उत्पादन विद्यापिठांनी करावं, असं वाटणारे लोक आहेतच. परंतु, अशा अवास्तविक स्वप्नांचं संगोपन करणाऱ्यांच्या दुर्दैवानं असा उलटा प्रवास शक्य नाही. बनारस हिंदू विद्यापिठातील विद्यार्थिनींनी हे सिद्ध केलं आहे. हा आनंद व्यक्त करण्याचा क्षण आहे. ●

**परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना**

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी ते सुवाच्च अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फाँटमध्ये पाठवावे.

# दास कॅपिटल, खं. १ ला – १५० वर्षं

*जागतिक भांडवली व्यवस्थेतील एका शोषित देशामधील भांडवली प्रक्रियेविषयीचं आकलन करून घेताना मार्क्सचा 'दास कॅपिटल'चा पहिला खंड आणि त्याचं इतर काही लेखन नक्की कशा प्रकारे सहाय्यकारी ठरतं?*

कार्ल मार्क्सच्या 'दास कॅपिटल'चा पहिला खंड जर्मनीतील हॅम्बर्ग इथं प्रकाशित झाला त्या घटनेला सप्टेंबर २०१७मध्ये १५० वर्षं पूर्ण होत आहेत. (पहिल्या खंडाचं इंग्रजी भाषांतर मात्र १८८७मध्ये प्रकाशित झालं. त्यापूर्वी १८७२मध्ये रशियन भाषेत– पहिल्यांदाच एका परकीय भाषेत– त्याचं भाषांतर प्रकाशित झालं होतं). सप्टेंबर १८६७मध्ये जर्मनमध्ये 'दास कॅपिटल' हा ग्रंथ प्रकाशित झाला. जागतिक भांडवली व्यवस्थेतील एका शोषक देशामधील भांडवली विकासप्रक्रियेच्या आकलनासाठी भौतिक विरोधविकासवादाची पद्धत पहिल्यांदाच यशस्वीरित्या वापरण्याचं काम या ग्रंथातून झालं. त्यामुळं राजकीय अर्थशास्त्र आणि सामाजिक शास्त्रांच्या इतिहासाला नवीन वळण देणारी ही घटना होती. मार्क्सनं अभिजात राजकीय अर्थनीतीच्या चिकित्सेसाठी भौतिक विरोधविकासवादाची पद्धती वापरून या अर्थशास्त्रीय विचारात परिवर्तन घडवलं. कॅपिटलमध्ये अमूर्त स्वरूपात सिद्धान्तन आहे आणि मूर्त स्वरूपात इतिहास आहे, आणि या दोहोंमध्ये अपरिहार्य तणावही आहे. मार्क्सला याची अचूक जाणीव होती, त्यामुळं त्यानं दोन्ही घटकांवर एक-आड-एक भर देत त्यांचं महत्त्व ठसवलं.

अंतिमतः कॅपिटलचे तीन खंड प्रसिद्ध झाले : पहिला खंड १८६७ साली प्रकाशित झाला, त्याची सुधारित आवृत्ती १८७२मध्ये आली; त्यानंतर दुसरा व तिसरा खंड मार्क्सच्या मृत्यूनंतर फ्रेडरिक एन्जल्सनं अनुक्रमे १८८५ आणि १८९४मध्ये प्रकाशित केले. भांडवलशाही इतिहासामध्ये एक व्यवस्था म्हणून कशी उलगडत गेली– तिचा उगम कसा झाला, तिचं कामकाज कसं चालतं, आणि ती संभाव्यतः कुठल्या दिशेनं जात आहे, याचं विश्लेषण हा मार्क्सच्या या ग्रंथाच्या गाभ्याचा भाग आहे. मूल्य, वरकड मूल्य, शोषणाचा दर (किंवा वरकड मूल्याचा दर), भांडवलाची सेंद्रीय रचना, नफ्याचा दर, सापेक्ष वरकड लोकसंख्या (किंवा औद्योगिक राखीव श्रम सैन्य), इत्यादी संकल्पनात्मक सामग्रीद्वारे मार्क्सनं अनेक अंतर्विरोधांचा शोध लावला : बदलाला चालना देणाऱ्या ऐतिहासिक शक्ती, समतोल साधणाऱ्या व्यवस्थात्मक शक्ती आणि त्यांच्यातील अस्वस्थकारक तणाव, असे ते अंतर्विरोध होत. या सैद्धान्तिक सामग्रीद्वारे त्यानं मूल्याच्या श्रम सिद्धान्ताची मांडणी केली, आणि भांडवलधारी/भांडवलनियंत्रक वर्गाकडून होणाऱ्या कामगारांच्या शोषणाचं विश्लेषण केलं. या मांडणीमध्ये त्यानं वरकड मूल्याचा उगम शोधला आणि हे मूल्य वाढवण्यासाठी भांडवली वर्गाकडून वापरल्या जाणाऱ्या पद्धतींवर प्रकाश टाकला.

महान इंग्रजी अभिजात राजकीय अर्थनीतीज्ञांपैकी एक गणला जाणाऱ्या डेव्हिड रिकार्डोपेक्षा अतिशय भिन्न प्रकारे मार्क्सनं संचय प्रक्रियेविषयीचा दृष्टिकोन मांडला. आर्थिक चक्र व संकटं यांमागील शक्ती, नफा दराची कोसळण्याची वृत्ती, आणि उपभोगक्षमतेच्या पलीकडं जाणाऱ्या उत्पादनक्षमतेची वृत्ती हे घटकही त्यानं उकलून दाखवले. त्याचसोबत भांडवलाचं संहतन आणि केंद्रीकरण या प्रक्रियेवरही मार्क्सनं प्रकाश टाकला. केंद्रीकरणाच्या प्रक्रियेसाठी विलिनीकरण आणि संपादनाचे मार्ग वापरले जातात. मार्क्सनं केलेल्या भांडवली गतिमानतेच्या मांडणीमध्ये उत्पादन आणि पैसा व वित्त हे दोन्ही मध्यवर्ती घटक होते. आणि अर्थातच मार्क्सच्या आकलनात क्रांतिकारी श्रमिकाची उत्क्रांती व वृद्धी हाही एक महत्त्वाचा घटक या प्रक्रियेत

होता. या सर्व परस्परसंबंधित प्रक्रिया 'अशा बिंदूवर जाऊन पोचतात जिथं त्यांच्या भांडवली आवरणाशी त्या विसंगत ठरू लागतात', त्यामुळं हे आवरण 'अलग' होऊन पडतं, 'हीच भांडवली खाजगी मालमत्तेची मृत्युघंटा असते. स्वामित्वहरण करणाऱ्यांचंच स्वामित्वहरण होतं.'

मार्क्सच्या म्हणण्यानुसार, श्रमिकांचा विकास क्रांतिकारी वर्गात होतो आणि ते भांडवली सत्ता उलथवून टाकतात, ही अपरिहार्य प्रक्रिया आहे. मार्क्सनं त्याची भौतिक विरोधविकासवादाची पद्धती अवलंबली असली, तरी फसव्या ऐतिहासिक नियतिवादामध्ये तो वाहावत गेला, असं वाटतं. त्याच्या लेखनाची शैली आणि त्यातील प्रतिमासृष्टी, त्याच्या गद्यामधील भव्यता, भांडवलाच्या दोषांचा पाढा वाचतानाची त्याची उत्कटता वाचकाला निश्चितपणे गुंतवून ठेवते (उदाहरणादाखल हे वाक्य पाहा: 'भांडवल म्हणजे मृत श्रम असतं आणि व्हॅम्पायरप्रमाणे जिवंत श्रमाचं रक्त शोषूनच ते जगू शकतं. जितके श्रम ते शोषून घेईल तितका काळ ते जगतं'), क्रांतिकारी बदलाची गरज असल्याची जाणीवही करून देते, परंतु यामध्ये लेखकाचा मूळ उद्देश वाहावत जातो. क्रांतिकारी बदलाच्या गतीविषयी तो अवाजवी अंदाज बांधतो आणि अशा बदलामधील अडथळ्यांचा अंदाज नोंदवताना त्रोटकपणा दाखवतो.

अर्थात, 'दास कॅपिटल' हा ग्रंथ केवळ 'राजकीय अर्थनीतीची चिकित्सा' एवढ्यापुरता मर्यादित नाही, तर अर्थशास्त्र आणि सामाजिकशास्त्र यांचं मूलगामी अर्थनिर्णयनही त्यात आहे. उदाहरणार्थ, मार्क्सच्या क्रयवस्तुस्तोम (कमॉडिटी फेटिशीझम) या संकल्पनेचं अर्थनिर्णयन पुढीलप्रमाणे करता येईल : क्रयवस्तूंच्या जगात वैयक्तिक संबंध हे वस्तूंमधील संबंध म्हणून मूर्त होतात. आणि माझ्यासारख्या जुन्या रीतींशी चिकटून राहणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टीनं, मानवी श्रम व स्वभाव यांच्या पिळवणुकीतून मालमत्तेचा उगम होतो हे सत्यही मार्क्सच्या लेखनातून सापडतं. खरंतर, मार्क्सला वाटणारी पर्यावरणाच्या समस्यांविषयीची आस्था आजच्या काळातील पर्यावरणीय समाजवाद्यांसारखी होती. समाज व निसर्ग यांच्यातील चयापचयक्रियेच्या संकल्पनेवर आधारित पर्यावरणीय व्यवस्थांचा दृष्टिकोन विकसित करण्याचे त्या काळात जे प्रयत्न सुरू होते त्याचाही मार्क्सवर खोल प्रभाव पडला होता. भांडवली उत्पादन 'एकाच वेळी सर्व मालमत्तेच्या मूळ स्रोतांना– जमीन आणि कामगार यांना क्षीण करत असते', असं 'दास कॅपिटल'च्या पहिल्या खंडात लिहिलेलं आहे शिवाय, पहिल्या खंडातील तिसरा भाग 'तथाकथित आदिम संचया'वरचा आहे. भांडवलशाहीचा उगम कसा झाला, याची चर्चा या भागात केली आहे. ब्रिटनमध्ये बंदिस्त शेतजमिनींच्या व्यवस्थेत ('एनक्लोजर' या नावानं परिचित) मजुरांचं स्वामित्वहरण होत असल्याच्या मुद्द्याची चर्चा मार्क्स इथं करतो. शिवाय, पर्यावरणीय धूप/ लूटमार ही जणू काही 'भांडवली उत्पादनाच्या युगाची गुलाबी पहाट' निर्देशित करत होती, असं परखड निरीक्षणही नोंदवतो.

अर्थात मार्क्सनं 'बूर्झ्वा अर्थव्यवस्थे'चं पद्धतशीर विवरण पूर्ण केलं नाही– विशेषतः भांडवली राज्यसंस्था, परकीय व्यापार आणि जागतिक बाजारपेठ या गोष्टी त्याच्या विवरणाच्या कक्षेत आल्या नाहीत, त्यामुळं जागतिक व्यवस्थेच्या स्वरूपातील भांडवलशाहीविषयीची सैद्धान्तिक रूपरेषा मांडली नाही. परंतु, आपण आधी पाहिल्याप्रमाणे पहिल्या खंडातील 'तथाकथित आदिम संचय' या भागामध्ये त्यानं उगवत्या भांडवलशाहीच्या प्रभावाची चर्चा केलेली आहे आणि जागतिक भांडवली व्यवस्थेचा परीघ त्यानंच बनलेला आहे. शिवाय, आधुनिक उद्योगांमधील यंत्रांचा वापर आणि वासाहतिक प्रभुत्व यांतून मिळालेल्या स्पर्धात्मक लाभामुळं युरोपीय देशांनी 'त्यांच्या अंकित देशांमधील सर्व उद्योग बळजबरीनं उचकटून टाकले', या प्रक्रियेचीही मांडणी त्यानं यंत्रं व आधुनिक उद्योगांसंबंधीच्या

प्रकरणात केली आहे. जागतिक व्यवस्थेच्या स्वरूपातील भांडवलशाहीमधील शोषणाधारित केंद्र-परीघ संबंधांची जाणीव मार्क्सला होती.

गेल्या दीडशे वर्षांमध्ये या जागतिक व्यवस्थेतील केंद्रस्थानी असलेल्या भांडवलशाहीचा विकास आणि परिघाच्या अल्पविकासाचा विकास या वास्तवाचा लेखाजोखा 'दास कॅपिटल'च्या चौकटीत घेतला, तर पुढील बाजू कदाचित प्रस्तुत ठरतील. आपल्या कामाचा नफा, आपण पिकवत असलेल्या जमिनीचं भाडं, आपल्या साठलेल्या कर्जावरील व्याज, एवढंच नव्हे तर आपल्या 'वेतना'चाही काही भाग 'भांडवलशहां'साठी सोडून देण्याचं बंधन गरीब शेतकऱ्यांवर असतं- हे शेतकरीही 'श्रमिक' वर्गाचा भाग ठरतील. व्यापारी भांडवलात औपचारिकरित्या अंतर्भूत करण्यात आलेले केवळ लघुउत्पादकही 'श्रमिक' वर्गाचा भाग ठरतील. शिवाय, व्यापारातील विषम विनिमयामुळं 'वरकड' मूल्यापासून वंचित राहिलेलेही याच वर्गाचा भाग ठरतील.

श्रमिकीकरणाची कमी पातळी, वेतनाधारित श्रमाच्या सक्रिय लोकसंख्येच्या तुलनेत श्रमाच्या राखीव लोकसंख्येचं प्रचंड प्रमाण, यामुळं नियमित व अनियमित वेतन कामगारांच्या वेतनावर आणि इतर मागण्यांवरच मर्यादा येते. शिवाय, बाजारपेठांमधील तीव्र स्पर्धा असलेल्या पुरवठाक्षेत्रामधील लघुउत्पादकांच्या उत्पादक किंमतींवरही त्याचं नियंत्रण राहातं. एकूण जागतिक भांडवली व्यवस्थेच्या नफा कमावण्याच्या क्षमतेला या प्रक्रियेतून पुष्टी मिळते. त्यातून निर्माण झालेलं दारिद्र्य अशा बिंदूपर्यंत जाऊन पोचतं जिथं जनतेच्या सापेक्ष क्रयशक्तीची वाढ रोखून धरली जाते, त्यामुळं उपभोगक्षमता घटते आणि अतिरिक्त क्षमतेत वाढ होते, त्यामुळं नवीन गुंतवणुकीवरील संभाव्य नफा कमी होतो, आणि त्यातून गुंतवणूक करण्याची प्रवृत्ती खचत जाते.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. दास कॅपिटलवरील टिपण बर्नार्ड डी'मेलो यांनी लिहिलेले आहे.

(१६, २३ व ३० सप्टेंबर या अंकांतून)


परिवर्तनाचा वाटसरू **प्रतिनिधी**

**अकोला शहर –** प्रा. अशोक इंगळे, भ्र. ९४२१७४७४१७

**अकोला जिल्हा –** प्रा. संतोष कायंदे, भ्र. ९४२१७४८७८२

**लातूर –** राहूल लोंढे भ्र. ७३८५५२१३३६

**नांदेड शहर –** प्रा. राजेंद्र गोणारकर, भ्र. ९८९०६१९२७४

**नांदेड जिल्हा** – प्रा. राजेंद्र इंगळे, भ्र. ९४२३३०५८२७

**परभणी शहर –** प्रा. प्रशांत मेणे भ्र. ९४२१३९२१३०, प्रा. संजय मोहाडे भ्र. ९४०५५९३४७२

**परभणी जिल्हा –** प्रा. सुरेश शेळके, ९४२२८७८७०६, बाळू बुधवंत, भ्र. ९४२१८६०८०७, ९९२२२९८४८८

**सातारा –** नितीन साळुंखे, भ्र. ९९७५६७०६१२

**सोलापूर –** रवींद्र मोकाशी, भ्र. ९४२२६४५०५५

**वाशिम –** शेषराव पिराजी धांडे, भ्र. ९९२३४८९६९७